महाराष्ट्र टाइम्स
Updated: 1 Dec 2011, 1041 hrs IST

**21st December 2011**

म. टा. प्रतिनिधी पुणे

'आदी बीज एकले... बीज अंकुरले... रोप वाढले', 'संत तुकाराम' या ७८ आठवडे चाललेल्या चित्रपटातील या गाण्याच्या ओळी कानावर पडल्या फक्त आणि एफटीआयआयमधल्या उपस्थितांचे अश्रू अनावर झाल्याचे त्या काळोख्या शांततेतही जाणविले. अत्यंत भारावलेल्या अवस्थेत पुन्हा एकदा विष्णुपंत पागनीसांचा अभिनय आणि प्रभात कंपनीच्या चित्राची इतक्या दशकांनंतर घेतलेली ही हळवी दखल कलाकारांच्या डोळ्यातही पाणी उभे करणारी ठरली.

प्रभात फिल्म कंपनीचे प्रमुख संस्थापक कै. विष्णुपंत गोविंदपंत दामले उर्फ दामलेमामा यांच्यावरील वीरेंद वळसंगकर यांनी दिग्दर्शित केलेला 'विष्णुपंत दामले - बोलपटांचा मूकनायक' हा चित्रपट फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियात (एफटीआयआय) मंगळवारी दाखवण्यात आला. 'मेसर्स ए. व्ही. दामले प्रभात चित्र' यांची निर्मिती असलेल्या या चित्रपटात ऋषिकेश जोशी, अश्विनी गिरी, प्रशांत तपस्वी, नितीन धंदुके, नचिकेत पूर्णपात्रे, राजेश पाठक आणि अंशुमन जोशी या कलाकारांच्या प्रमुख भूमिका आहेत. सचिन खेडेकर यांच्या निवेदनाने या डॉक्युड्रामाला एक वेगळेच वजन आले आहे. केदार दिवेकर यांचे संगीतही कालसुसंगत आहे.

दामले यांची 'प्रभात' उभी करण्यामागची धडपड आणि चित्रपटाचे प्रगत तंत्रज्ञान उपलब्ध नसतानाही फत्तेलाल शेख आणि राजा नेने यांच्या साथीत दिग्दर्शित केलेले संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, गोपालकृष्ण, संतसखू यांसारखे चित्रपट... 'अयोध्येचा राजा'साठी ध्वनिलेखक म्हणून करून ठेवलेली अजोड कामगिरी ते लॉ कॉलेजच्या टेकडीच्या जागेत 'प्रभात' उभी करताना दाखवलेली स्थापत्यकला... 'विष्णुपंत दामले - बोलपटांचा मूकनायक' हा या सगळ्याचा पट उलगडणारा चित्रपट आहे. चित्रपटाच्या प्रदर्शनादरम्यान प्रमुख कलाकारांसह तंत्रज्ञ, माहिती संकलक, सहाय्यक आणि दामले कुटुंबीय असे सगळेजण एफटीआयआय येथे आवर्जून उपस्थित होते.

**प्रभातचित्र 'पिफ'मध्ये**

'विष्णुपंत दामले - बोलपटांचा मूकनायक' हा चित्रपट शुक्रवारी (दि. २३) कोल्हापूरमधील एशियन फिल्म फेस्टिव्हलदरम्यान आणि पुण्यात होणाऱ्या पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्येही (पिफ) दाखवण्यात येणार आहे.